# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

गो.वि./म.वि /473 /२०१९

दिनांक: 27 /03 /२०१९

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

## परीपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी
संलग्नित महाविद्यालये
(गडचिरोली जिल्हा.)

विषय :– पंडित दिनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत प्राप्त झालेले अर्ज तातडीने निकाली काढण्याबाबत

संदर्भ :–जावक. कं./शिक्षण २०१९/प्र.क्र./का./४ (क)/५५१ दिनांक २६/०२/२०१९
प्राप्त दिनांक १२/०३/२०१९

महोदय

उपरोक्त संदर्भाकीत विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, महाराष्ट्र शासन, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांच्या कार्यालयांकडुन पंडित दिनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत प्राप्त झालेले अर्ज तातडीने निकाली काढण्याबाबत चे पत्र प्राप्त झालेले असुन सदर पत्र सोबत संलग्नित करण्यात येत आहे. महाविद्यालयाने संलग्नित केलेल्या पत्रानुसार कार्यवाही घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठात सादर करावा.

(डॉ. व्ही.सी. सिलारे)
प्र.उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र संलंग्नित :– उपरोक्तप्रमाणे

शासन,

...ना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
...क क्र. 1546 दिनांक 11/3/19
... क्र. ........ दिनांक ........

महाराष्ट्र शासन
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली
L.I.C ऑफीस जवळ, कॉम्प्लेक्स गडचिरोली

फोन-०७१३२-२२२२८६
pogadchiroli@yahoo.com

जावक.क्रं /शिक्षण २०१९/प्र.क्र/का.४(क)/ 1549

दि: २६/०२/२०१९

प्रति,
प्राचार्य, गोंडवाना
विद्यापिठ गडचिरोली

विषय : पंडित दिनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत प्राप्त झालेले अर्ज तातडीने निकाली काढण्याबाबत.

संदर्भ : मा.अपर आयुक्त यांचे पत्र क्र १०७५ दिनांक २५/०२/२०१९ अन्वये

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सध्यास्थितीत महानगर पालीका , विभागीय शहरे , आणि जिल्हास्तरावर सुरु असलेल्या स्वंयम योजनेबरोबर सन-२०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासुन तालुकास्तरावरील इयता १२ वी नंतरच्या मान्यता प्राप्त तंत्र शिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयामध्ये केंद्रिभुत प्रक्रियेव्दारे प्रवेश घेतलेल्या परंतु शासकिय वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या अनु.जमातीच्या विद्यार्थ्यांना "पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वंयम योजना " योजने अंतर्गत भोजन , निवास व इत्तर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या आधार सलग्न बॅक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्यास संदर्भिय शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी कळविण्यात येते की, महाविद्यालय स्तरावरील पंडित दिनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत अर्ज भरलेल्या अर्जाची तसेच कागदपत्रांची तपासणी करुन प्रकल्प स्तरावर दि. २६.२.२०१९ ला ५.०० वाजेपर्यंत कोणत्याही परिस्थितीत निकाली काढावयाच्या आहेत अश्या सुचना मा.आयुक्त, आदिवासी विकास ,म.रा.नाशिक यांनी दिनांक २५.२.२०१९ रोजी विडीओ कॉन्फरन्स सभेत दिलेल्या आहेत विहीत दिनांकास किवा विहीत मुदतीत निकाली न काढल्यास सबंधितावर कारवाई प्रस्तावित करण्याच्या सुचना देखील दिलेल्या आहेत. महाविद्यालय स्तरावर प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घेऊन सहकार्य करावे. यांची नोंद घ्यावी.

(डॉ.सचिन ओम्बासे, भा.प्र.से.)
सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
गडचिरोली

मा. विभागप्रमुख / ५ ही विभाग
३. कु. सेवा विभाग
तातडीने परिपत्रक निर्गमित करावे.
11/3/19

प्रतिलीपी : मा.अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग नागपुर यांना माहितीस्तव सविनय सादर.

(डॉ.सचिन ओम्बासे, भा.प्र.से.)
सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,